



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ११९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.१२ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# वंदे मातरमवरील चर्चा संघाचे कपडे फाडण्यासाठी?; उद्धव ठाकरे यांच्या विधानाने खळबळ

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, मुंबई :** आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांची पत्रकार परिषद पार पडली, या पत्रकार परिषदेमध्ये विविध मुद्दे उपस्थित करत त्यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. भ्रष्टाचाराचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी जोरदार टीका केली.

तसेच गोमांसांचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी केंद्र सरकारला चांगलंच धारेवर धरलं. तुमच्या मंत्रिमंडळात गोमांस खाणारे मंत्री आहेत. मी गोमांस खातो. कोण मला आडवतो बघतो असं ते म्हणतात, असं यावेळी उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे, तसेच यावेळी बोलताना त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर देखील जोरदार हल्लाबोल केला आहे. दिल्लीत संघाच्या कार्यालयासाठी प्राचीन मंदिर पाडलं. ही बातमी जोरात चालली. संघाच्या कार्यालयासाठी मंदिर पाडलं, तुम्ही हे कृत्य करतात. मी मुख्यमंत्री असतना साधूची घटना घडली. त्याला सरकार जबाबदार आहे असं चित्र तुम्ही तयार केलं.

साधू हत्याकांडावरून आमच्या सरकारला बदनाम केलं. त्या हत्याकांडातील व्यक्तीला भाजपमध्ये घेताना तुमचं हिंदुत्व काय मेलं होतं का. लाज वाटली पाहिजे अमित शाह यांना आणि भाजपला त्यांनी माझ्या हिंदुत्वावर शंका घेतली, तुमच्या बुडाखाली काय आहे ते आधी पाहा, असा हल्लाबोल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे.

दरम्यान पुढे बोतलाना ते म्हणाले की, न्यायामूर्तींवरची केस पाहा. माझी न्यायामूर्तींनीही आक्षेप घेतला आहे. मंदिराच्या आवारात दिवा लावण्यावरून वाद आहे. तिथे दिवा लावलाच पाहिजे. उत्सव साजरा झालाच पाहिजे. हिंदुत्वावरून अमित शाह यांनी शिकवू नये. वंदे मातरम ही चर्चा त्यांनी संघाचे



कपडे उतरवण्यासाठी घेतली की काय अशी आता शंका येते. ते ज्यांना देव मानतात त्या शामाप्रसाद मुखर्जींचं सुद्धा मुस्लिम संघटनेंबरोबर काय साटंलोटं होतं, आणि त्यांनी चलेजाव चळवळीला कसा विरोध केला होता.

फजरुल हक बरोबर बंगालच्या सरकारमध्ये यांचे देव, माझे नाहीत, शामाप्रसाद मुखर्जी देशप्रेम बाजूला ठेवून सामील झाले होते. हे सर्व आलं आहे. तीन ठिकाणी त्यांनी मुस्लिम लीग सोबत सरकार स्थापन केलं होतं. हे त्यांचे राजकारणातील जन्मदाते त्यांनी आम्हाला हिंदुत्व शिकवायचं? असा थेट सवालच यावेळी उद्धव ठाकरे यांनी यावेळी केला.

## जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन साजरा



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.११, बुलढाणा :** जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला असून या निमित्त जिल्हा कारागृहातील बंद्यांच्या मानवी हक्क व संरक्षणाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन बुधवारी करण्यात आले. उच्च न्यायालयालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांचे सहमतीने व महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष यांचे आदेशान्वये महाराष्ट्र राज्य मानवी हक्क व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने हा आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाला पोलीस अधीक्षक निलेश तांबे, निवासी उपजिल्हाधिकारी सुरेश कव्हळे, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव नितीन पाटील, पोलीस उपअधीक्षक बाळकृष्ण पावरा, कारागृह अधीक्षक मेघा बाहेकर, नायब तहसिलदार विजय हिवाळे उपस्थित होते.

जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी बंद्यांना त्यांचे विविध मानवी हक्क व संरक्षणाबाबत माहिती दिली. त्यानंतर सचिव नितीन पाटील यांनी कैद्यांना त्यांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांबाबत मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधीक्षक मेघा बाहेकर यांनी केले. सुत्रसंचालन वरिष्ठ लिपीक अमित मांजरे यांनी केले तर तुरुंगाधिकारी उमेश नाईक यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीत्येसाठी सुभेदार बबन खंडारे, दरेसिंग चव्हाण यांचेसह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते बंद्यांना संविधान उद्देशिकेचे वाटप करण्यात आले.

## तेलगाव मध्ये ट्रॅक्टरची शाळकरी मुलास धडक गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.११, सोलापूर :** आपल्या शेतातील वस्तीवरून गावामध्ये बाजार आणण्यासाठी चालत जात असलेल्या तेलगावच्या १५ वर्षाच्या मुलाला पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या ट्रॅक्टरने जोराची धडक दिली. यात गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात तेलगाव -भंडरकवठे रस्त्यावर आज बुधवारी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घडला.

योगेश सुभाष बिराजदार (वय १५) राहणार तेलगाव (तालुका दक्षिण सोलापूर) असे या अपघातात दुर्दैवी मृत्यू झालेल्या शाळकरी मुलाचे नाव आहे. याबाबत मिळालेली माहिती अशी की, मयत योगेश बिराजदार व त्याच्या आई वडील हे भंडारकवठे रस्त्यावरील आपल्या शेतातील वस्तीवर राहत होते. योगेश हा भंडाराकवठे येथील जीवन विकास प्रशालेत इयत्ता आठवी वर्गात शिकत होता. आज बुधवारी पाच वाजता शाळा सुटल्यानंतर तो शेतातील वस्तीवर आला. त्यानंतर सहा वाजता तेलगावातून बाजार आणण्यासाठी तो पायी चालत निघाला होता. अथणी वस्तीजवळ आल्यानंतर त्यास पाठीमागून भरधाव वेगात आलेल्या ट्रॅक्टरने जोराची धडक दिली.

यामध्ये त्याच्या अंगावरून चाक गेले. यात गंभीर जखमी झाल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. अपघातानंतर ट्रॅक्टर चालक पळून गेला. अपघात झाल्याचे समजल्यानंतर ग्रामस्थांनी घटनास्थळी गर्दी केली. पोलिसांना याची माहिती देण्यात आली. तेव्हा मंद्रुप पोलीस ठाण्याचे हवालदार शहानुर मुलाणी हे घटनास्थळी आले. त्यांनी पंचनामा केल्यानंतर मृतदेह मंद्रुपच्या ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मंद्रूप पोलीस ठाण्यात या अपघाताची नोंद झाली आहे.

## महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचा मोठा निर्णय! २२०७ उमेदवारांचे निकाल रद्द

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी (TAIT) २०२५ परीक्षेच्या निकालांसंदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आवश्यक कागदपत्रे सादर न केलेल्या २,२०७ उमेदवारांचे निकाल रद्द करण्यात आले आहेत. ही कारवाई परीक्षा परिषदेने दिलेल्या मुदतीनंतरही कागदपत्रे सादर न केल्यामुळे करण्यात आली आहे. या निर्णयाची माहिती महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

टेट परीक्षा महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने आयोजित केली होती. ही परीक्षा २६ जिल्ह्यांमध्ये ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली होती, ज्यात एकूण ६० परीक्षा केंद्रे होती. परीक्षा २७ मे २०२५ ते ३० मे २०२५ आणि पुन्हा २ जून २०२५ ते ५ जून २०२५ या आठ दिवसांमध्ये, दररोज तीन सत्रांमध्ये पार पडली. या परीक्षेसाठी एकूण २,२८,८०८ उमेदवारांनी नोंदणी केली होती आणि २,११,३०८




उमेदवारांनी परीक्षा दिली. ही परीक्षा आयबीपीएसद्वारे घेण्यात आली होती.

टेट परीक्षेच्या निकालानंतर, ज्या उमेदवारांनी B.Ed. किंवा D.Ed. पात्रतेसह अर्ज केला होता, त्यांना या व्यावसायिक अभ्यासक्रमांची गुणपत्रिका किंवा इतर वैध प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक होते. उमेदवारांना त्यांची व्यावसायिक पदवी उत्तीर्ण झाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत ही कागदपत्रे महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडे, पुणे येथे सादर करण्याची मुदत देण्यात आली होती. सुरुवातीला, ९ सप्टेंबर २०२५ च्या सार्वजनिक सूचनेद्वारे कागदपत्रे सादर करण्याची अंतिम मुदत १५ सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली होती. त्यानंतर, २,५३७ उमेदवारांना एसएमएसद्वारे आणखी मुदतवाढ देण्यात आली, ज्यामध्ये गुणपत्रिका किंवा वैध प्रमाणपत्रे सादर करण्याची नवीन अंतिम मुदत २५ सप्टेंबर २०२५ निश्चित करण्यात आली होती.

या वाढीव मुदती आणि एसएमएस सूचनांनंतरही, सुरुवातीला मुदतवाढ मिळालेल्या २,५३७ उमेदवारांपैकी २,२०७ उमेदवार २५ सप्टेंबर २०२५ पर्यंत त्यांची गुणपत्रिका किंवा इतर वैध प्रमाणपत्रे सादर करू शकले नाहीत. परिणामी, त्यांचे निकाल रद्द करण्यात आले आहेत. ज्या २,२०७ उमेदवारांचे निकाल रद्द झाले आहेत, त्यांची यादी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या अधिकृत संकेतस्थळावर www.mscepune.in प्रसिद्ध करण्यात आली आहे. या रद्द करण्याच्या संदर्भात यापुढे कोणताही अर्ज किंवा विचार केला जाणार नाही, असे अधिसूचनेत स्पष्टपणे नमूद केले आहे.

# मराठा - कुणबी समाजाला आठ दिवसात न्याय द्या..

## अन्यथा पाटण तहसिल कार्यालया समोर आंदोलन करणार

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.११, पाटण :** पाटण तहसिल व प्रांत कार्यालयातून कुणबी प्रमाणपत्रांसाठी नियमबाह्य व चुकीच्या त्रुटी काढून कुणबी प्रमाणपत्र देण्यास होत असलेल्या विलंब संदर्भात सकल मराठा समाज पाटण तालुक्याच्या वतीने जिल्हाधिकारी सातारा संतोष पाटील यांना निवेदन देण्यात आले. ५८ वर्ष आरक्षण पासून वंचित राहिलेल्या मराठा - कुणबी समाजाला आठ दिवसात न्याय द्यावा अन्यथा सकल मराठा समाजाकडून पाटण तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल. असा इशारा या निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. या निवेदना सोबत शासन निर्णयाची प्रत जिल्हाधिकारी सातारा यांना भेट देण्यात आली आहे.

जिल्हाधिकारी सातारा यांना देण्यात आलेल्या निवेदनात पुढे म्हणले आहे की पाटण तहसिल व प्रांत कार्यालयातून कुणबी जातीच्या दाखल्यांसाठी विद्यार्थी व पालकांची वाताहत होताना दिसत आहे. एखाद्या कुटुंबाच्या वंशावळीत कुणबी जातीचा पुरावा मिळाल्यास त्या कुटुंबातील विद्यार्थ्यांने जातीचा दाखला मिळण्यासाठी सर्व कागदपत्रांची जुळवाजुळव करून अर्ज केल्यास अशा अर्जदारास त्याच कुटुंबातील आणखी दुबार पुरावा मागण्याचा अट्टाहास केला जात आहे. इतर जातींचे दाखले एकाच पुराव्यावर दिले जातात मग कुणबींच्या दाखल्यांना दुबार पुराव्यांची गरज काय..? हा प्रश्न मराठा समाजातून व्यक्त केला जात आहे.

तात्कालिन प्रांताधिकारी राजेंद्र तांबे, सुनिल गाढे, तहसिलदार रमेश पाटील, योगेश्वर टोंपे यांच्या काळात कुणबी दाखले एका पुराव्यांवरून तसेच बहिणींच्या नोंदीवरून दिले गेलेले आहेत. याची वारंवार कल्पना सध्याचे महसूल विभागाचे अधिकारी यांना सकल मराठा समाजाने दिली आहे. तरी देखील



न पटणारे मुद्दे उपस्थित करुन कुणबी अर्जांवर चुकीच्या त्रुटी दाखवल्या जात आहेत. यामध्ये मराठा समाजाची फरफट पाटण तहसिल व प्रांत कार्यालयात होत आहे.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- ब, असाधारण क्रं- २२९ दि.- ३ जुलै २०१८ च्या शासन निर्णयानुसार पूर्वीच्या तत्कालीन अधिकाऱ्यांनी इतर जातींच्या दाखल्यांसाठी असणारी कार्यपद्धती त्या अनुषंगाने कुणबी दाखल्यांसाठी निश्चित केलेली कार्यपद्धती सध्याच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी पुर्णतः बदलून जे आवश्यक नसणाऱ्या बाबी कुणबी प्रकरणात घालून अर्जदारांची डोकेदुखी वाढवली आहे. अधिकारी, कर्मचारी यांनी बदल केलेल्या नियमानुसार कुणबी दाखला काढण्यासाठी अर्जदारास पाटण तहसिल कार्यालयात सहा ते आठ महिने हेलपाटे मारावे लागत आहेत. याची गांभीर्याने वरिष्ठांनी दखल घेऊन शासन निर्णयानुसार इतर जातींच्या दाखल्या प्रमाणे कुणबी दाखल्यांची कार्यपद्धती अवलंबवावी अशी मागणी सकल मराठा समाजाची आहे. आपणास विनंती की कुणबी नोंद असलेली कुटुंब गेली ५८ वर्ष आरक्षण पासून वंचित आहेत आम्हाला आठ दिवसात न्याय द्यावा अन्यथा सकल मराठा समाजाकडून पाटण तहसिल कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल. असा इशारा या निवेदनाव्दारे देण्यात आला आहे. या निवेदनावर सकल मराठा समाजाचे यशवंतराव जगताप, राजेंद्र निकम, सुवर्णा पाटील, प्रशांत पाटील, लक्ष्मण चव्हाण, महेंद्र घार्गे, दत्तात्रय पाटील, शिवाजी निकम, सुनिल कदम, सुनिल मोहिते, दत्तात्रय पवार, विकास मोहिते, विजय मोहिते, आबासो मोहिते

*** त्रुटीचे मुद्दे-**

१) एक पूरावा असेल त्यांना सरळ वंशावळीत दाखले देण्यात यावे.

२) पूर्वी वारस फेरफार मध्ये मुलींच्या नावांची नोंद होत नसे याचा सरासरी विचार करून मुलींच्या जन्म/ मृत्यू नोंदी पाठीमागील त्यांच्या वडीलांच्या नावासमोरील कुणबी नोंद ग्राह्य धरावी. व वडीलांची वारस नोंद ग्राह्य धरावी.

३) महसुली जन्म/ मृत्यू पुराव्यात अनेक नोंदीत मुलगा अथवा मुलगी यांच्या नावांची नोंद झालेली नाही मात्र वडीलांचे नाव अधोरेखित करुन त्या नावापुढील मुलगा अथवा मुलगी या रकान्यात आकडा १ असे दाखवून वडीलांच्या पूर्ण नावासमोर कुणबी नोंद दाखवलेले आहे. हा पुरावा ग्राह्य धरण्यात यावा. कारण जात ही वडीलांच्या कडून मुलांकडे येते हे लक्षात घ्यावे.

४) अधिकाऱ्यांच्या कडून एका गावात एकाच नावाच्या दोन, तीन, चार व्यक्ती असू शकतात असा कयास आहे. यासाठी डबल पुराव्यांची मागणी केली जाते. मात्र ज्या ठिकाणी अशी शंका असेल तेथे वारस फेरफार त्यावरील गट नं, सर्व्हे नंबर सातबारा वरील वारसांची नोंद तपासणी करावी. या कारणासाठी दुसऱ्या पुराव्यांची मागणी करु नये.

५) प्रतिज्ञापत्रावरील वंशावळीत ज्या नावांचा संबंध लागतो तिच नावे क्रमप्राप्त धरावी विनाकारण फेरफार, रेशनकार्ड वरील सर्व नावांचा आग्रह केला जातो.

६) जिल्हा जात पडताळणी कार्यालयातील तपासणी पथकाने मंजूर केलेल्या अर्जावर देखील पाटण तहसिल कार्यालयात त्रुटी मारल्याचे उदाहरणे आहेत.




## मराठा आरक्षणाबाबत कोर्टात काय घडलं?

मराठा आरक्षणासंदर्भात मोठी बातमी समोर येत आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला मागास ठरवताना सादर केलेल्या अहवालावर मुंबई हायकोर्टात याचिकाकर्त्यांनी आज आक्षेप घेतला आहे. मराठा समाजाला आरक्षण देण्याचा अधिकार राज्य सरकारला नाही तर केंद्र सरकारला असून, राज्य सरकारने आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडत घटनेचे उल्लंघन केल्याचा युक्तिवाद यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला आहे. मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गातून आरक्षण देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून तसा कायदा संमत केला आहे, मात्र या कायद्यामुळे मराठा समाजाला मिळालेले आरक्षण अवैध असल्याचा दावा करत हाय कोर्टात विविध याचिका दाखल करण्यात आल्या आहेत.

दुसरीकडे ज्यापद्धतीने या मराठा आरक्षणाच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत, त्याच पद्धतीने मराठा आरक्षणाच्या समर्थनार्थ देखील काही याचिका मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत. या एकत्रित याचिकांवर न्यायमूर्ती रवींद्र घुगे, न्यायमूर्ती निजामुद्दीन जमादार आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या पूर्णपीठासमोर आज सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी याचिकाकर्त्यांच्या वतीने ज्येष्ठ वकील अनिल अंतुरकर यांनी युक्तिवाद केला, त्यांनी यावेळी खंडपीठाला सांगितले की, सामाजिक, शैक्षणिक निकषावर दिलेले आरक्षण आणि जातीय निकषावर दिलेले आरक्षण वेगवेगळे आहेत. मुळात केंद्र सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार असताना राज्य सरकारने समाजाला सरसकट आरक्षण दिले आहे. त्यातही ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडली गेली आहे, त्यामुळे हे आरक्षण वैध नसल्याचा दावा ज्येष्ठ वकील अनिल अंतुरकर यांनी केला आहे.

**पुढील सुनावणी १७ जानेवारीला**

दरम्यान वेळेअभावी या प्रकरणावरील युक्तिवाद अपूर्ण राहिल्याने आता न्यायालयाने सुनावणी १७ जानेवारी पर्यंत तहकूब करण्याचा निर्णय घेतला आहे. १७ जानेवारी रोजी या प्रकरणात न्यायालय नेमका काय निर्णय घेणार याकडे आता सर्वांचं लक्ष लागलं आहे. राज्य मागासवर्ग आयोगाने मराठा समाजाला मागास ठरवताना सादर केलेल्या अहवालावर मुंबई हायकोर्टात याचिकाकर्त्यांनी आक्षेप घेतल्यामुळे ही याचिका आरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

## शौर्याचा खजिना दिल्लीकरांसाठी होणार खुला!

मे महिन्यात गोव्यात सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव यशस्वीरीत्या पार पाडल्यानंतर येत्या १३ आणि १४ डिसेंबरला सनातन संस्था आणि सेव्ह कल्चर सेव्ह भारत या दोन्ही संघटना मिळून आंतरराष्ट्रीय पातळीवर ख्याती असलेल्या दिल्लीतील भव्य भारत मंडपममध्ये पुन्हा एकदा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवाचे आयोजन करत असल्याचे वृत्त वाचनात आले. महोत्सवादरम्यान गोव्यामध्ये ज्याप्रकारे इतिहासकालीन अस्त्र आणि शस्त्र यांचे प्रदर्शन भरवण्यात आले होते तशाच स्वरूपाचे किंबहुना त्याहून भव्य दिव्य असे पुरातन अस्त्र-शस्त्र प्रदर्शन लोकांना पाहायला मिळणार आहे. या प्रदर्शनात छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळातील सुमारे २५० हून अधिक दुर्मिळ आणि ऐतिहासिक शस्त्रे ठेवण्यात येणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी हाताळलेल्या अनेक शस्त्रांचे साक्षात दर्शनही याठिकाणी घेता येणार आहे. त्यासमवेतच अन्य मराठा साम्राज्यातील सेनापतींनी चालवलेली शस्त्रे प्रदर्शनात असणार आहेत. महाराणा प्रताप यांच्या काळातील शस्त्रांसह कर्नाटकातील विजयनगर साम्राज्यकालीन तलवारी, शिवकालीन युद्धपरंपरा, धातूशास्त्र, 'लोखंड ते शस्त्र' या संकल्पनेवर आधारित मराठा शस्त्रनिर्मिती प्रक्रिया या ठिकाणी समजावली जाणार आहे. इतिहासकालीन हिंदू स्त्रियांनी आत्मरक्षणासाठी वापरलेल्या शस्त्रांचाही या प्रदर्शनात समावेश असणार आहे. अशा प्रकारचे भव्य शस्त्रप्रदर्शन दिल्लीत पहिल्यांदाच आयोजित केले जात असल्याने ते पाहणे नक्कीच रोमांचकारी असणार आहे.

**- ज्योती रावराणे,**
**कांजूरमार्ग**

# वाढदिवस दक्षिणेतील देवाचा

दक्षिणेतील देव अशी ओळख असलेले सुपरस्टार रजनीकांत यांचा आज ७५ वा वाढदिवस. सुपरस्टार रजनीकांत यांच्या शिरपेचात चार वर्षांपूर्वी एक मानाचा तुरा रोवला गेला होता. रजनीकांत यांना चित्रपटसृष्टीतील सर्वोच्च अशा मानाच्या दादासाहेब फाळके पुरस्काराने चार वर्षापूर्वी गौरविण्यात आले होते. ६७ व्या राष्ट्रीय फिल्म पुरस्कार सोहळ्यात तत्कालीन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू आणि केंद्रीय मंत्री अनुराग ठाकूर यांच्या हस्ते त्यांना या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले होते. रजनीकांत यांना यापूर्वी पद्मभूषण (२०००) व विद्मविभूषण (२०१६) या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. जिवंतपणीच आख्यायिका बनलेले रजनीकांत हे एक अवलिया व्यक्तिमत्त्व. रजनीकांत यांच्या नावावर अनेक विनोद, टोमणे, उपदेश, म्हणी, मिम्स प्रचलित आहेत. रजनीकांत यांचे देश विदेशात हजारो फॅन क्लब्ज आहेत. रजनीकांत यांना उद्देशून एखादा अपशब्द जरी काढला तरी तामिळनाडूत दंगली उसळतात. त्यांच्या इतकी लोकप्रियता कोणत्याच अभिनेत्याला मिळालेली नाही. त्यांचा चित्रपट प्रदर्शित होण्यापूर्वीच सुपरहिट झालेला असतो. त्यांच्या चित्रपटाचे तिकीट काढण्यासाठी प्रेक्षक पहाटेपासूनच रांगा लावतात. त्यांच्या फोटोवर दुग्धाभिषेख करतात. तामिळनाडूत तर त्यांची मंदिरे आहेत. देवाप्रमाणे लोक त्यांची पूजा करतात. १२ डिसेंबर १९५० रोजी बंगळुरू येथे एका महाराष्ट्रीयन कुटुंबात रजनीकांत यांचा जन्म झाला. त्यांचे खरे नाव शिवाजीराव गायकवाड असून त्यांच्या वडिलांचे नाव रामोजीराव गायकवाड असे असून आईचे नाव जिजाबाई असे आहे. पुरंदर तालुक्यातील मावडी- कडेपठार हे त्यांचे मूळ गाव. ८० - ९० वर्षांपूर्वी त्यांचे कुटुंब बंगळुरात स्थलांतरित झाले व तिथेच स्थायिक झाले. त्यांचे वडील कर्नाटक पोलिसात शिपाई होते. रजनीकांत यांना लहानपणापासून अभिनयाचे वेड होते. अभिनयाचे वेड जपत त्यांनी अनेक लहानसहान कामे केली. बारावी पास झाल्यावर काही काळ त्यांनी बस कंडक्टर म्हणूनही काम केले. नशिब आजमावण्यासाठी त्यांनी मद्रास फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये प्रवेश घेतला आणि सिनेजगताला एक सुपरस्टार मिळाला. अपूर्ण रागंगल या तामिळ चित्रपटातुन त्यांनी आपल्या फिल्मी करियरची



सुरवात केली. आजवर त्यांनी १५० हुन अधिक चित्रपटात भूमिका केल्या. अंधा कानून या चित्रपटातून त्यांनी बॉलिवूड मध्ये पदार्पण केले. केवळ तामिळ आणि हिंदीच नव्हे तर कन्नड, तेलगू, तामिळ, बंगाली, इंग्रजी चित्रपटातून भूमिका केल्या. त्यांच्या अभिनय कारकिर्दीला नुकतेच पाच दशके पूर्ण झालीत. तब्बल पाच दशके आपल्या अभिनयाने चित्रपटसृष्टीवर अधिराज्य गाजवणारे रजनीकांत हे आपल्या अभिनयाबरोबरच आपल्या डॅशिंग स्टाईल आणि स्टंट साठीही ओळखले जातात. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वजण त्यांचे चाहते आहेत. दक्षिण भारतीय चित्रपटसृष्टीचे अनभिषिक्त सम्राट, प्रेक्षकांची गर्दी खेचून आणणारे, आपल्या संवाद फेकी बद्दल प्रसिद्ध आणि विशिष्ट स्टाईल बद्दल प्रसिद्ध आणि आपल्या विशिष्ट अभिनय शैली साठी रजनीकांत ओळखले जातात. दक्षिण भारतात त्यांच्या नावे सर्वात जास्त यशस्वी चित्रपट आहेत. त्यांचा चाहतावर्ग देशातच नाही तर विदेशातही आहे. जपानमध्ये त्यांचा मोठा चाहतावर्ग आहे. तिथे त्यांचे चित्रपट अधिक लोकप्रिय आहेत. तिथेही त्यांचे फॅन क्लब्ज आहेत. सर्वाधिक चाहतावर्ग असलेला अभिनेता म्हणून त्यांची गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये त्यांची नोंद झाली आहे. त्यांना चार वेळा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कारही मिळाला आहे. रजनीकांत जितके अभिनेते म्हणून श्रेष्ठ आहेत तितकेच ते माणूस म्हणूनही श्रेष्ठ आहेत. ते त्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या एकूण ४० टक्के एव्हढी रक्कम समाजसेवेसाठी वापरतात. रजनीकांत हे असे एकमेव अभिनेते आहेत की जे एकाही उत्पादनाची जाहिरात करत नाहीत. उद्देश एकच की लोकांमध्ये कोणताही चुकीचा संदेश जाऊ नये. जिवंतपणीच आख्यायिका बनलेल्या या सुपरस्टारला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# वॉरियर तायक्वांदो अकॅडमीचा महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो चॅम्पियनशिप मध्ये शानदार ठसा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, नाशिक :** ७ ते १० डिसेंबर दरम्यान नाशिक येथे झालेल्या महाराष्ट्र ओपन स्टेट तायक्वांदो चॅम्पियनशिप २०२५ मध्ये वॉरियर तायक्वांदो अकॅडमीच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. आमच्या खेळाडूंनी कौशल्य, जिद्द आणि प्रबळ आत्मविश्वास दाखवत शानदार यश मिळवले. अकॅडमीच्या दोन कुशल खेळाडूंनी सुवर्णपदक पटकावले.

✻ **सुवर्णपदक विजेते :** देव गोथणकर, साई लांडगे

त्यांचे समर्पण, कठोर सराव आणि खेळावरील प्रेम या यशातून स्पष्टपणे दिसून येते. अकॅडमीच्या दोन खेळाडूंनी उत्तम कामगिरी करत कांस्यपदक मिळवले.

✻ **कांस्यपदक विजेते :** वेदांत इंगळे, रुजुला परब

त्यांची जिद्द, चिकाटी आणि लढाऊ वृत्ती प्रत्येक सामन्यात झळकली.

स्पर्धेत उत्साहाने भाग घेऊन अकॅडमीचा मान उंचावणारे खेळाडू

✻ **उत्तम सहभाग :** इशा विश्वस ठरे, आर्यन वानी, वेदांत पॉयरेकर, मायकेल अग्रेल

त्यांचा सहभाग त्यांच्या धैर्य, शिस्त आणि शिकण्याच्या इच्छेचे प्रतीक आहे.



✻ **विशेष आभार :** ठाणे जिल्ह्यातील सर्व खेळाडूंकडून मनःपूर्वक आभार

संदीप ओंबसे, अध्यक्ष – महाराष्ट्र तायक्वांदो

रोहित जाधव, सचिव – ठाणे जिल्हा

तसेच कोच मंगेश औटी यांचे विशेष आभार, ज्यांच्या मार्गदर्शनाने आणि सततच्या प्रयत्नांनी खेळाडूंमध्ये खऱ्या अर्थाने 'वॉरियर' भावना निर्माण झाली.

## अधिकार




माहितीचा अधिकार
न्याय रूपात सुविधा
सत्य कथन करतात
असता शंका दुविधा

सशक्तप्रशासनास्तव
सक्षममदती कायदा
स्पटिकासम सत्यता
करतोनक्की वायदा

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

सामान्य नागरिकांस
अद्भुत अमोलसंपदा
गुड गव्हर्नन्स संबधि
जणूही खुलीनिविदा

नियमांच्या चौकटीत
करतो माहिती वादा
प्रक्रिया संपूर्ण करुन
सादर करतो मसुदा

अधिकार जाणायचा
किंमत मोठी कागदा
प्रस्तुत होईलं सगळे
पाळून सकलमर्यादा

गैर वापर करणा-या
मात्र मिळेलं मलिदा
जपूनराहणेजरूरीचे
घेऊ शके गैरफायदा

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# उद्योजकतेची नवी वाट : आळस झटका, धाडस करा, नाविन्य स्वीकारा!



सोलापूर शहरात मातंग समाजातील तरुणांसाठी उद्योजकता कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत १०० पेक्षा जास्त तरुण-तरुणींनी सहभाग घेतला. स्ट्रॅटेजिक डिझायनर आणि दूरदृष्टी नेतृत्व संतोष खवळे यांनी या कार्यशाळेला मार्गदर्शन केले.

या कार्यशाळेत उद्योग सुरू करताना कोणकोणत्या अडचणी येतात आणि त्या अडचणींवर उपाय कसे शोधायचे यावर गटकार्य घेऊन सादरीकरण करण्यात आले. प्रत्येक गटात चर्चा घडवून आणण्यात आली. प्रत्येक गटांनी सुमारे २०-२५ अडचणी मांडल्या. त्या अडचणी पुढीलप्रमाणे होत्या भांडवल उभे करणे, आत्मविश्वासाची कमतरता, प्रशिक्षणाची गरज, जागेची अडचण, जातीभेदावर आधारित सामाजिक रचना, विक्री-कौशल्याचा अभाव, आवश्यक यंत्रसामुग्री, कुशल मनुष्यबळ, बँका व शासनाकडून पतपुरवठ्याच्या अडचणी इत्यादी.

या सर्व अडचणींवर उपाय देखील त्याच गटातून सुचविण्यात आले. बहुतेक उपाय हे मनोधैर्य, आत्मविश्वास, सकारात्मक विचार व कठोर परिश्रम या मनोविश्लेषणात्मक अंगांवर आधारित असल्याचे दिसून आले. थोडक्यात, उद्योग उभारण्यासाठी मनाची खंबीरता आणि अफाट कष्ट घेण्याची क्षमता आवश्यक असल्याचाच सर्वांचा सूर होता.या निमित्ताने उद्योग उभारणीमध्ये मला तीन गोष्टी विशेष महत्त्वाच्या वाटल्या

**१)** आळस झटकणे- 'उद्योगी' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द म्हणजे 'आळशी'. धननिर्मितीसाठी उद्योग उभारायचा असेल, तर सर्वप्रथम आळस पूर्णपणे झटकला पाहिजे. जो लवकर उठतो तो सूर्याप्रमाणे तळपतो, या म्हणीप्रमाणे उद्योग उभा करू इच्छिणाऱ्यानी दिवसाची सुरुवात लवकर करायला हवी. कामे वेळेवर करण्याची सवय लावली पाहिजे. कामे टाळत गेलो तर एक दिवस मोठा ढिगारा आपल्यासमोर उभा राहतो. आळशी व्यक्ती उद्योगात कधीच यशस्वी होत नाही, कारण चालढकल, टाळाटाळ आणि निवांतपणा हे उद्योगवृद्धीला अडथळा ठरतात.

**२)** धाडस -धाडसाशिवाय माणूस कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकत नाही. उद्योगात उतरायचे असेल, तर जोखीम घेण्याचे धाडस आवश्यक आहे. शासन किंवा खाजगी नोकरीत दरमहा पगाराची शाश्वती असते; पण उद्योगात अशी खात्री नसते. म्हणूनच उद्योग उभारणीसाठी मनाची खंबीर तयारी, सकारात्मकता आणि संकटांना तोंड देण्याची मानसिकता आवश्यक आहे.

**३)** नाविन्यपूर्ण कल्पना -गेल्या आठवड्यात मला दोन नाविन्यपूर्ण उत्पादनांची माहिती मिळाली. ही दोन्ही उत्पादने काळाच्या बदलत्या गरजांनुसार विकसित करण्यात आली आहेत.पहिले उत्पादन बाथरूममध्ये नळाला बसवायचे उपकरण आहे. बोरवेलच्या पाण्यातील क्षार, गाळ आणि अपायकारक पदार्थ वेगळे करून केस गळती कमी करण्याचा त्याचा हेतू आहे. सद्यकाळात फॅशनेबल दिसण्याची इच्छा असणाऱ्या लोकांसाठी हे उत्पादन मोठ्या प्रमाणात उपयोगी ठरू शकते. जड पाण्याला हलके करणारे हे उपकरण नळाला बसवल्यास बोरचे पाणी केस धुवायला थेट वापरता येणार आहे. अर्थातच या पाण्याने केस धुतले तरी टक्कल पडणार नाही.

दुसरे उत्पादन रसायनयुक्त फळे आणि भाज्या स्वच्छ करण्यासाठी वापरायच्या द्रावणाचे आहे. पुण्यातील ' ग्रीन पिरॅमिड बायोटेक प्रायव्हेट लिमिटेड ' या कंपनीने सो फॅब हे उत्पादन विकसित केले आहे. कीटकनाशके, रासायनिक रंग आणि इतर हानिकारक पदार्थ दूर करण्यासाठी हे द्रावण प्रभावी ठरत आहे. हरितक्रांतीनंतर मोठ्या प्रमाणात पिकावर कीटकनाशके आणि बुरशीनाशके फवारली जाऊ लागली. त्याचे दुष्परिणाम गर्भवती महिलांपासून ते सामान्य लोकांच्या आरोग्यावर दिसू लागले. कर्करोगाचे प्रमाण वाढले. अशा काळात हे उत्पादन अत्यंत उपयुक्त ठरत आहे.तसेच मांस व मासे स्वच्छ धुण्यासाठी 'ला प्लेशॉल' हे उत्पादनही कंपनीने आणले आहे. यामुळे ९९ टक्के सूक्ष्मजीव मारले जाणार आहेत. हे दोन्हीही उत्पादने मानवी शरीराला अपायकारक नाहीत. त्यामुळे येत्या काळात या उत्पादनांना मागणी वाढणार आहे.

लोकांच्या बदलत्या गरजा आणि समस्या ओळखून नवनवीन उत्पादने विकसित करणे ही आजच्या उद्योजकाची खरी ताकद आहे. यासाठी आवश्यक असणारे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे. लोकांच्या गरजा ओळखून एखाद्या उद्योगाने काम केले, तर त्याच्या उत्पादनाला मोठी मागणी निर्माण होऊन कमी कालावधीत तो उद्योग मोठा होतो.

उद्योग उभारणी ही फक्त भांडवलाची किंवा साधनसामुग्रीची गोष्ट नाही; ती दूरदृष्टी, धाडस आणि सातत्य यांची संगम आहे. आळसावर विजय, संकटात धाडस आणि नाविन्यपूर्ण विचार या तीन गुणांवर भक्कम पायाभरणी केली, तर कोणत्याही समाजातील तरुण-तरुणी यशस्वी उद्योजक होऊ शकतात.

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## न.लो.संस्था संलग्न तालुका गुहागर शाखेच्या सभेला उत्स्फूर्त प्रतिसाद...



**अक्षराज : उदय दणदणे**


**दि.११, गुहागर :** नमन लोककला संस्था मध्यवर्तीच्या माध्यमातून प्रतिवर्षी राबविण्यात येणारा जागर नमन लोककलेचा सन्मान लोककलावंतांचा हा उपक्रम गुहागर तालुक्यात राबविण्याच्या हालचालींनी वेग घेतला असून सदर बाबत नुकतीच न.लो.संलग्न -तालुका शाखा गुहागर वतीने तालुका शाखेचे उपाध्यक्ष जगन्नाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बुधवार दिनांक १० डिसेंबर २०२५ रोजी, सकाळी १० वा.दुर्गादेवी देवस्थान ट्रस्ट,गुहागर शहर याठिकाणी सर्वसाधारण जनरल सभा पार पडली,सदर सभेत नमन जागर -२०२६ गुहागर मध्ये व्हावा असा सभागृहात एकमुखाने मान्यता मिळाली.

गुहागर तालुक्यातील नमन कलाकारांसाठी शासकीय योजनांचे लाभ मिळविण्यासाठी त्याच बरोबर सदर सभेत गुहागर तालुका शाखेची पुढील वाटचालीस अधिक गती मिळावी यासाठी सर्वानुमते विविध निर्णय घेत ठराव संमत करण्यात आले. प्रथमच नमन जागर -२०२६ गुहागर नगरीत होत असल्याने येथील न.लो.सं सलग्न तालुका शाखा कार्यकारणी जोरदार तयारीला लागले असून संलग्न गाव -वाडी नमन मंडळ, नमन मंडळांचे प्रतिनिधी, निर्माते, कलाकार यांनी मोठया संख्येने उपस्थित राहून सहकार्य करावे असे आवाहन न.लो.संस्था संलग्न तालुका शाखा गुहागर अध्यक्ष सुधाकर मास्कर यांनी केले आहे.

सदर पार पडलेल्या सभेला गुहागर तालुका शाखा अध्यक्ष सुधाकर मास्कर, उपाध्यक्ष प्रमोद घुमे, सहसचिव सुधीर टाणकर, खजिनदार उदय दणदणे, सदस्य: दीपक वेलुंडे, जनार्दन आंबेकर, प्रशांत भेकरे, शांताराम शिंदे, अमित काताळे त्याचबरोबर प्रवीण बारगोडे तसेच गुहागर तालुक्यातील अनेक गाव मंडळ, प्रतिनिधी, कलाकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर सभेला दुर्गादेवी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष किरण खरे यांचे मोलाचे योगदान लाभले.

## डॉक्टरांवर अन्याय का ? खा.बजरंग सोनवणेंनी उठविला संसदेत आवाज...

### * ८ तासाची ड्यूटी देण्याबाबत मागणी...




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.११, बीड :** देशातील पीजी रेसिडेंट डॉक्टरांना ३६ ते ४८ तास सलग, कोणत्याही विश्रांतीशिवाय काम करायला लावले जात आहे. इतर क्षेत्रात आठ ते बारा तास काम करण्याचे नियम आहेत मग हा नियत डॉक्टरांनाच का लागू नाहीत, हा सरळ सरळ अमानवी अत्याचार आहे, यामुळे डॉक्टरांच्या ड्यूटीच्या वेळेत बदल करावा, अशी आग्रही मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी संसदेत मांडली.

दिल्ली येथे सुरू असलेल्या संसदीय अधिवेशनात खा.बजरंग सोनवणे यांनी डॉक्टरांच्या ड्यूटीच्या वेळेबद्दलचा महत्वाचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी बोलताना ते म्हणाले, देशातील पीजी रेसिडेंट डॉक्टरांना ३६ ते ४८ तास सलग, कोणत्याही विश्रांतीशिवाय काम करायला लावले जाते आहे. मुळात असे काम केल्यास डॉक्टरांवर ताण तणाव निर्माण होते. इतर क्षेत्रात आठ ते दहा तास कामाची वेळ आहे.

मग डॉक्टरांनाच ३६ ते ४८ तास काम का करावे, लागते. आरोग्यव्यवस्थेचे आधारस्तंभ असलेल्या डॉक्टरांवर असे क्रूर वेळापत्रक का?, झोपेचा अभाव, थकवा, सततचा ताण, या अवस्थेत रुग्णसेवा करणाऱ्या डॉक्टरांना आणि रुग्णांना दोघांनाही धोका निर्माण होतो. यामुळे सलग ३६ ते ४८ तासांच्या ड्यूटी तात्काळ बंद कराव्यात, ८ तासांच्या मानवी आणि वैज्ञानिक कामाच्या मर्यादा लागू कराव्यात, हे कर्तव्यनिष्ठेचे परीक्षण नाही तर हा अन्याय आहे, आणि तो आता थांबायलाच हवा. आपण सर्वांनी मिळून तरुण डॉक्टरांच्या पाठीशी आपण सर्वांनी उभे राहिले पाहिजे, असेही खा.बजरंग सोनवणे म्हणाले.

## राष्ट्रीय सिनिअर तायक्वांडो स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय पंच सुभाष पाटील यांची पंच प्रमुख पदावर निवड



**अक्षराज : संदिप येवले**

**दि.११, मुंबई :** ४१वी राष्ट्रीय सिनिअर तायक्वांडो स्पर्धा २०२५ जी. एम.सी. बालायोगी इनडोअर स्टेडियम हैदराबाद येथे दिनांक ११ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान होणा-या तायक्वांदो स्पर्धेसाठी पंच प्रमुख म्हणून रायगड चे सुपुत्र तायक्वांदो आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ तायक्वांदो रेफरी युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची पंचपदी निवड झाली आहे.

सुभाष पाटील हे ७ वी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत. त्यांनी आतापर्यंत अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पंच म्हणुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे. आंतरराष्ट्रीय ज्युनियर तायक्वांदो स्पर्धा दक्षिण कोरिया २००४ भारतीय संघाचे कोच, पंच पहिली आंतरराष्ट्रीय स्पर्धा २०१० भारत, पंच कॉमनवेल्थ स्पर्धा २०११ आंतरराष्ट्रीय तायक्वांदो स्पर्धा दक्षिण कोरिया २०११, भारतीय संघाचे कोच, पंच ११ वी इस्त्राईल ओपन तायक्वांदो स्पर्धा २०१३ पंच ८ वी स्कॉटिश ओपन स्पर्धा २०१३ स्कॉटलंड, संघप्रमुख कोरिया ओपन २०१४, आंतरराष्ट्रीय सॅफ गेम २०१६,लुसोफोतीया तायक्वांदो स्पर्धा नियंत्रक २०१४ गोवा, कॅनडा ओपन व पैरा ओपन तायक्वांदो चॅम्पियनशिप २०१७ पंच २०२३, वर्ल्ड तायक्वांदो प्रेसिडेंट कप व ओशियाना पॅरा व ऑस्ट्रेलियन ओपन स्पर्धा २०२५तसेच आतापर्यंत अनेक स्पर्धा परिक्षा मध्ये सहभागी होऊन सुभाष पाटील यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

सुभाष पाटील नुकत्याच साउथ अफ्रीका येथे आंतरराष्ट्रीय रेफरी रीफ्रेसर सेमिनार करून आले आहेत या सेमिनार मध्ये नविन नियम शिकवण्यात आले आहेत ४१ वी राष्ट्रीय सिनिअर तायक्वांडो स्पर्धेसाठी सुभाष पाटील हे ११ डिसेंबर रोजी हैदराबाद येथे रवाना होत आहेत. त्यांना या स्पर्धेसाठी तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) ) रायगड तायक्वांदो असोसिएशन चे सर्व पदाधिकारी व आमदार प्रशांत ठाकूर साहेब,विधान परिषद आमदार विक्रांत पाटील साहेब व परेश ठाकुर साहेब यांच्या कडून विशेष शुभेच्छा देण्यात आल्या.

# चंद्रपूरच्या रेल्वे समस्या सोडवा : आ. किशोर जोरगेवार




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात आ. किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूरातील सुरू असलेल्या रेल्वे धरणे आंदोलनाचा मुद्दा प्रामुख्याने उपस्थित केला. काही दिवसांपूर्वी त्यांनी रेल्वे प्रवासी सेवा संघटनेतर्फे सुरू असलेल्या आंदोलनस्थळी भेट देऊन प्रवाशांच्या सर्व मागण्या प्रत्यक्ष ऐकून घेतल्या होत्या. त्यावेळी दिलेल्या आश्वासनानुसार त्यांनी हा प्रश्न सभागृहात पुन्हा मांडत राज्य सरकारने या मागण्यांचा पाठपुरावा केंद्र शासनाकडे तातडीने करावा अशी मागणी केली. सभागृहात बोलताना आ. जोरगेवार म्हणाले, चंद्रपूर जिल्ह्यातील प्रवासी संख्या प्रचंड आहे. विद्यार्थी, कामगार, व्यावसायिक तसेच उद्योग क्षेत्राच्या वाढत्या गरजांमुळे रेल्वे सुविधांचा विस्तार अत्यावश्यक झाला आहे. त्यामुळे या मागण्या केवळ प्रवासी संघटनांच्या नव्हे तर संपूर्ण जिल्ह्याच्या आहेत. यावेळी त्यांनी चंद्रपूर–मुंबई दैनंदिन सुपरफास्ट सेवा, चंद्रपूर–नागपूर शटल सेवा, गोंदिया दुरंतो एक्स्प्रेसची सुरुवात चंद्रपूरहून करण्याची गरज, तसेच चंद्रपूर–कोलकाता अशी चंद्रपूरची माता महाकाली ते कलकत्ता ची महाकाली थेट रेल्वे सेवा सुरू करण्याची मागणी केली. या सर्व मागण्या जनहिताच्या असून तातडीने अंमलात आणण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

आ. जोरगेवार यांनी राज्य सरकारला या मागण्या त्वरित केंद्र शासनाकडे पाठवून चंद्रपूरकरांच्या दीर्घकालीन अपेक्षांची पूर्तता करण्यासाठी गांभीर्याने प्रयत्न करावेत अशी मागणी केली आहे.

**चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्यात आयरन–आधारित मोठा उद्योग उभारा : आ. जोरगेवार**

नागपूर हिवाळी अधिवेशनात आमदार किशोर जोरगेवार यांनी चंद्रपूर–गडचिरोली जिल्ह्याच्या औद्योगिक क्षमतेकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की या परिसरात तब्बल ३ लाख कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक येण्याची शक्यता असून याचा व्यापक फायदा स्थानिक विकासाला होणार आहे. या पार्श्वभूमीवर चंद्रपूरम ध्ये आयरन–आधारित मोठा उद्योग उभारण्याची तातडीची गरज असल्याचे त्यांनी ठामपणे मांडले. ते म्हणाले, चंद्रपूरचे भौगोलिक स्थान, खनिजसंपत्ती आणि उपलब्ध संसाधने पाहता आयरन उद्योगासाठी हा भाग सर्वाधिक उपयुक्त आहे. असा उद्योग उभा राहिल्यास मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल आणि या भागात औद्योगिक वाढीस मोठे चालना मिळेल. या विषयात शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आ. जोरगेवार यांनी सभागृहात केली.

# बोगस दिव्यांग प्रमाणपत्र ; चंद्रपूर जिल्हा परिषदेतील १२ कर्मचाऱ्यांवर बडतर्फीची कारवाई

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.११, चंद्रपूर :** दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रम णपत्राची तपासणी करण्याचे निर्देश दिले होते.

त्यानुसार जिल्हा परिषद प्रशासनाने दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्राची तपासणीची प्रक्रिया राबविली. या प्रक्रियेदरम्यान यूडीआयडी (वैश्विक ओळखपत्र) सादर न केल्याप्रकरणी १२ कर्मचाऱ्यांना बडतर्फे करण्यात आल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांच्या द्वारे प्राप्त होत आहे. म हाराष्ट्र शासनाच्या दिव्यांग कल्याण विभागाचे प्रधान सचिव तुकाराम मुंढे यांनी शासनामध्ये सेवेत असलेल्या राज्यातील सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांची तपासणी करण्याचे आदेश जारी केले होते. त्यानुसार प्रत्येक विभागामध्ये कारवाई सुरू करण्यात आली. जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील कार्यरत असलेले दिव्यांग अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तपासणी करण्यात आली. यात अधिकारी, कर्मचाऱ्यांची यूडीआयडी (वैश्विक) प्रमाणपत्र सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांनी ही कारवाई केली. यात पंचायत समितीतील काही कर्मचारी आणि कनिष्ठ अभियंत्यांचाही समावेश आहे. या कारवाईने जिल्हा परिषदेअंतर्गत कर्मचाऱ्यांत मोठी खळबळ उडाली आहे. जिल्हा परिषदेत २५४ दिव्यांग कर्मचारी आहेत. त्यापैकी १६९ दिव्यांग कर्मचाऱ्यांनी यूडीआयडी सादर केले. ८५ कर्मचाऱ्यांनी यूडीआयडी सादर केले नाही.

मात्र, यातील ७३ कर्मचाऱ्यांनी यूडीआयसाठी अर्ज केले. यातील दोन अर्ज नाकारण्यात आले. तीन कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व ४० टक्क्यांपेक्षा कमी आढळून आले. यूडीआयडी सादर न करणाऱ्या व ४० टक्क्यांपेक्षा कमी दिव्यांग असलेल्या बारा कर्मचाऱ्यांना बडतर्फ करण्याचा निर्णय मुख्य कार्यपालन अधिकारी पुलकित सिंग यांनी ८ डिसेंबर रोजी घेतला.

बडतर्फ करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये दहा शिक्षक आणि दोन कनिष्ठ अभियंत्यांचाही समावेश आहे. या कारवाईने बोगस प्रमाणपत्र घेऊन भरती झालेल्या दिव्यांगाना घाम फुटला आहे. जिल्हा परिषदेच्या विविध विभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांवर टप्प्याटप्प्याने कारवाई सुरू झाल्याने अधिकारी, कर्मचाऱ्यांत खळबळ उडाली आहे.

# 'सेंट स्टीव्ह कॉन्व्हेंट स्कूल'च्या १५व्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, कोपरखैरणे (नवी मुंबई) :** 'सेंट स्टीव्ह कॉन्व्हेंट स्कूल' कोपरखैरणे तर्फे १५ वे वार्षिक स्नेहसंमेलन दिनांक १२ डिसेंबर रोजी 'विष्णूदास भावे नाट्यगृह' वाशी येथे दिमाखात आणि मोठ्या उत्साहात आयोजित करण्यात आले आहे.

विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकास घडवून आणण्यासाठी, त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी, दरवर्षी स्नेहसंमेलन आयोजित केले जाते. दरवर्षीप्रमाणे यंदाही हा स्नेहसंमेलन सोहळा भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. सदर कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत.

शाळेचे ट्रस्टी फिडेल थॉमस यांच्यासह शिवसेना, शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के, विजय चौगुले (उपनेते), विजय नाहटा (उपनेते), साहिल चौगुले (युवा नेते), सौरभ शिंदे (युवा नेते) उपस्थित राहणार असून त्यामुळे कार्यक्रमाचे वैभव आणि महत्त्व अधिक वाढणार आहे, असे शाळा व्यवस्थापनाने सांगितले आहे.

सदर कार्यक्रमात सांस्कृतिक नाटिका, संगीत कार्यक्रम, व आकर्षक नृत्य यांचे सादरीकरण केले जाणार आहे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांनी वर्षभरात केलेल्या विशेष परफॉर्मन्स म ध्ये शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार केला जाणार आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी सांस्कृतिक स्नेहसंम ेलन हा अत्यंत महत्त्वाचा कार्यक्रम असून, छत्रपती शिवाजी महाराज चौक, वाशी, येथील 'विष्णुदास भावे नाट्यगृह' तुडुंब भरणार असल्याचा विश्वास स्कूल प्रशासनाने व्यक्त केला आहे. सकाळी ११ ते ०२ वाजेपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमास आपण सर्वांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहनही स्कूल प्रशासनाने केले आहे.

# आई-वडील व शिक्षकांचा सदैव मान राखा : आमदार श्रीजया चव्हाण

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.११, नागपूर :** लहान मुले ही मातीचा गोळा असतात त्यांना सुयोग्य आकार देऊन त्यांची मूर्ती घडविण्याचे महान कार्य शिक्षक करतात. त्यामुळे प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षकांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या आई-वडिलांचा आणि गुरुजनांचा सदैव मान राखला पाहिजे असे प्रतिपादन भोकर मतदारसंघाच्या आमदार तथा माजी केंद्रीय मंत्री शंकरराव चव्हाण यांच्या नात श्रीजया चव्हाण यांनी केले. खापरखेडा शंकरराव चव्हाण विद्यालयात आयोजित सदिच्छा भेट व सत्कार समारंभात त्या बोलत होत्या.

पुढे बोलतांना आमदार श्रीजया चव्हाण यांनी आपल्या कुटुंबाचा आणि शाळेचा जुना ऋणानुबंध उलगडला, त्या म्हणाल्या सन २००० मध्ये राज्याचे महसूलमंत्री असताना माझे वडील अशोकराव चव्हाण यांनी या विद्यालयाच्या रौप्य महोत्सवाला भेट दिली होती. आज २५ वर्षांनंतर शाळेचा सुवर्ण महोत्सव असताना मला येथे येण्याचा योग आला हा क्षण माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आहे.

आपल्या आजोबांच्या आठवणी सांगताना त्या भावुक झाल्या. मी माझ्या आयुष्यातील काही काळ आजोबा स्व. शंकरराव चव्हाण यांच्या सहवासात घालवला आहे. त्यांच्या मनात देशासाठी काहीतरी करण्याची ओढ होती. दोन वेळा मुख्यमंत्री आणि देशाचे गृहमंत्री पद भूषवूनही त्यांची देशाप्रती असलेली प्रामाणिकता खूप मोठी होती जेव्हा मी त्यांची पुस्तके वाचते, तेव्हा मला त्यांचा आणि त्यांच्या विचारांचा सार्थ अभिमान वाटतो, अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराविमं कर्मचारी शिक्षण संस्थेचे सचिव ईश्वर राऊत होते प्रमुख अतिथी म्हणून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमरावार, उपमुख्य अभियंता नितीन रोकडे,



संस्थेचे पदाधिकारी प्रशांत जालंदर, यामिनी घोरमाडे, संध्या ठाकरे, प्रतिभा खब्राडे, गणेश चिखले, किशोर बक्सरिया, सुनील जालंदर, अमर जैन, विलास मल्ले, किशोर खोरगडे, संजय गुंजरकर, मुख्याध्यापिका वीणा पांडे, मोनाली सुरकर आदी मंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी मराविमं कर्मचारी शिक्षण संस्था आणि शाळा–महाविद्यालयाच्या वतीने आमदार श्रीजया चव्हाण यांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचा आमदार श्रीजया चव्हाण यांच्या हस्ते गौरव व कला प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका मोनाली सुरकर व वीणा पांडे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन वेदिका ढगे यांनी केले. 'वंदे मातरम' गीताने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी मोठ्या संख्येने विद्यार्थी, शिक्षक व पालक उपस्थित होते.

# गोरगरीब चळवळीतील कार्यकर्ता राजकारणात दिसणार नाही : माजी आ. रविंद्र धंगेकर

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.११, खडकवासला (पुणे) :** कार्यकर्ता आणि सामजिक कार्य करणारे आता संपणार आहेत. पैसे नसणाऱ्यांकडे सामाजिक कार्य करताना अडचणी येत आहेत. पूर्वीसारखे नमस्कार करुन निवडणुका आता जिंकता येत नाही. पैशांशिवाय राजकारण करता येत नाही. त्यामुळे यापुढील काळात गोरगरीब चळवळीतला कार्यकर्ता राजकारणात दिसणार नाही. श्रीमंताची, घराणेशाही असणाऱ्यांची मुले आता यापुढील काळात राजकारणात दिसतील, असे मत माजी आमदार रविंद्र धंगेकर यांनी व्यक्त केले.

जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटस आणि सत्या फाउंडेशन यांच्यावतीने गरीब व गरजू लोकांना १२,००० कपड्यांचे वाटप करण्यात आले. नऱ्हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल येथे उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेना शहराध्यक्ष साईनाथ बाबर, विद्यार्थी सेना शहराध्यक्ष महेश भोईबार, जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर, सत्या फाउंडेशनच्या अध्यक्ष गीतांजली जाधव आदी उपस्थित होते.

साईनाथ बाबर म्हणाले, आपण जाती- धर्मात अडकून राहिलो आहोत. विकासावर कोणी बोलत नाही. बरेचसे देश जातीपातीच्या पलीकडे गेले आहेत. आपला देश विकसित होऊन पुढे आला पाहिजे, यासाठी सगळ्यांनी प्रयत्न केले पाहिजेत.




महेश भोईबार म्हणाले, शिक्षणासोबतच सामाजिक उपक्रम राबविले तर मुलांना आयुष्यभर उपयोगी पडतात. शिक्षणाचा व्यवसाय अनेक संस्थांनी केला आहे अशावेळी जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट तर्फे होणारे समाजपयोगी उपक्रम स्तुत्य आहेत.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, आपल्या धर्मात वस्त्रदान हे श्रेष्ठ दान आहे, असे आपल्या धर्मात सांगितले आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षांपेक्षा अधिक वर्षे झाली परंतु आजही अनेक लोकांना स्वच्छ धुतलेले कपडे घालायला मिळत नाही. केवळ चांगले कपडे घालायला न मिळाल्याने लोकांचा आत्मविश्वास कमी होतो. त्यामुळे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

## थोडक्यात

### दिव्यांगाना व गरजू व्यक्तीना ब्लँकेट वाटप

**अक्षराज : अरुण कुत्तरमारे**



**दि.११, पोंभुर्णा :** तेली समाजाचे आराध्य दैवत संत शिरोमणी संताजी जगनाडे महाराज यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून समाजसेवा करण्याचा उपक्रम जामखोर देते राबवण्यात आला. जाम खुर्दचे माजी उपसरपंच बंडू बुरांडे यांच्या वतीने गावातील व परिसरातील दिव्यांग व गरजू व्यक्तींना उद्धार ब्लँकेट चे वाटप करण्यात आले या उपक्रमामुळे थंडीच्या दिवसात कठीण परिस्थितीत गरजू व्यक्तींना मोठा दिलासा मिळाला आहे.

पूर्णा तालुक्यातील जाम खुर्द येथे संत शिरोमणी जगनाडे महाराज यांची जयंती उत्साह साजरी करण्यात आली. समाज प्राप्ती कृतज्ञ सेवाभाव व्यक्त करण्याच्या उद्देशाने जाम खुर्द चे माजी सरपंच यांनी गावातील व परिसरातील दिव्यांग व गरजू व्यक्तींना बँकेचे वाटप करून एक चांगला उपक्रम राबवण्यात आला या उपक्रमाबद्दल सर्व स्तरावरून कौतुक करण्यात येत आहे.

# महापुरात झालेल्या नुकसानीची त्वरित भरपाई द्या !

## वांगी ग्रामस्थांचा उद्या जिल्हाधिकारी कार्यालयावर आंदोलनाचा इशारा

**शिवराज मुगळे**

**दि.११, सोलापूर :** महापुरात अद्याप दक्षिण सोलापूर तालुक्यातील वांगी गाव हे मोठ्या प्रमाणात बाधित झाले. दोन महिने उलटले तरी गावातील शेतकऱ्यांना शासनाकडून नुकसान भरपाईपोटीची रक्कम मिळालेली नाही. शुक्रवारपर्यंत बाधित शेतकरी व नागरिकांना रक्कम मिळावी, अन्यथा शुक्रवारी १२ डिसेंबर रोजी आंदोलन करण्याचा इशारा वांगी ग्रामस्थांनी दिला आहे.यंदाच्या पावसाळ्यात सीना

नदीला आलेल्या महापुरात वांगी, नंदूर, मनगुळी आदी सहा गावांना पुराचा १०० टक्के फटका बसला आहे. शासनाने शेतकरी व



नागरिकांच्या नुकसानीची ठराविक रक्कम जाहीर केली. घरांमध्ये पाणी शिरून संसारोपयोगी अनेक साहित्याचे अतोनात नुकसान झाल्यापोटी दिलेल्या

तत्काळ १० हजार रुपयांची मदतही अद्याप गावकऱ्यांना मिळाली नाही. शेतकरी प्रशासन अधिकाऱ्यांच्या कार्यालयात अनेक हेलपाटे घालूनही दाद मिळत नाही. ही रक्कम तत्काळ मिळावी, अन्यथा ग्रामस्थांच्यावतीने १२ डिसेंबर रोजी सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढून आंदोलन करणार असल्याचे निवेदन, वांगी शेतकरी ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना देण्यात आले आहे.

> ▶महापुरात लोकांच्या घरात मोठ्या प्रमाणात पाणी शिरून प्रचंड नुकसान झाले आहे. शासनाकडून जाहीर केलेली तत्काळ दहा हजाराचा मोबदलादेखील ७० टक्के कुटुंबांना मिळाला नाही. अधिकाऱ्यांनी चार-चार वेळा शेतकऱ्यांकडून माहिती घेतली. पंचनामे केले. याबाबत ग्रामसेवक, तलाठ्यांशी संपर्क साधला असता उडवाउडवीची उत्तरे मिळत आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहे.
>
> **- सूरज खडाखडे, माजी सरपंच, वांगी**

### नॉन व्हेज खाणाऱ्यांना फ्लॅट नाकारणे प्रश्नावर काही अंशी यश

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.११, मिरा भाईंदर :** मंत्री प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेत स्पष्टपणे सांगितले की, कोणताही विकासक भाषा, जात, प्रांत किंवा आहार पद्धतीच्या आधारावर फ्लॅट नाकारत असेल तर त्यांच्या विरोधात कडक कारवाई करण्यात येईल.

हा निर्णय निश्चितच स्वागतार्ह आहे. मात्र, याच अनुषंगाने काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण होतात. राज्यात सध्या भाजप–शिवसेना सरकार सत्तेत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून जे. पी. नॉर्थ या संकुलात हिंदू–मुस्लीम वाद पेटविण्याचा आणि समाजात तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला.

त्या ठिकाणी मुस्लीम समाजाला फ्लॅट देण्यास व राहण्यास विरोध करण्यात आला. त्यामुळे समाजात द्वेष पसरवणाऱ्या अशा कृतींवर आपण कारवाई करणार का? हाही आजचा गंभीर प्रश्न आहे.

भारतीय संविधानाचे अनुच्छेद १४ व १५ सर्व नागरिकांना समानतेचा अधिकार व भेदभावापासून संरक्षण देतात.

धर्म, जात, प्रांत किंवा आहाराच्या नावाखाली कोणत्याही नागरिकाला निवास मिळण्याचा हक्क नाकारणे हे असंवैधानिक असून मानवी अधिकारांचे घोर उल्लंघन आहे.

म्हणूनच, सरकारने केवळ जाहीर वक्तव्य न ठेवता अशा सर्व प्रकरणांमध्ये त्वरित, निष्पक्ष आणि कडक कारवाई करावी, जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांचा प्रशासनावरचा विश्वास दृढ राहील.

# रत्नागिरी जि.प. केंद्रस्तरीय हिवाळी स्पर्धेत वाल्मिकीनगर शाळेची दमदार 'एन्ट्री'

**अक्षराज : उमेश तबीब**

**दि.११, दापोली (रत्नागिरी) :** मंडणगड तालुक्यातील निसर्गरम्य वाल्मिकीनगर जेटीच्या किनाऱ्यावर १० डिसेंबर २०२५ रोजी आयोजित रत्नागिरी जिल्हा परिषद पुरस्कृत केंद्रस्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धा प्रचंड उत्साहात पार पडल्या. वेसवी केंद्रातील १२ शाळांनी या क्रीडा महोत्सवात भाग घेतला असताना, जि.प. आदर्श मराठी शाळा, वाल्मिकीनगरच्या चिमुकल्या खेळाडूंनी प्रतिस्पर्धकांना कडवी झुंज देत नेत्रदीपक यश मिळवले आणि आपल्या शाळेचा दबदबा सिद्ध केला.

**वाल्मिकीनगरच्या रणरागिणींचा 'कबड्डी'त सुवर्ण ठसा!**

वाल्मिकीनगर शाळेच्या मुलींच्या संघाने कबड्डीच्या



मैदानात अभूतपूर्व समन्वय दाखवत प्रथम क्रमांक पटकावला. भूमिका तबीब, श्रुती कुलापकर, तन्वी पाटील, सिया कुलापकर, स्वरा वाडे, आराध्य डोळस आणि राधिका पाटील या मुलींनी प्रतिस्पर्धी संघाला चितपट करत विजेतेपद मिळवले.

यासोबतच, खो-खो (लहान गट मुलगे) संघाने उपविजेतेपदावर नाव कोरले. वैयक्तिक स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली:

**उंच उडी :** तन्वी पाटील

**थाळी फेक :** श्रुती कुलापकर

यशामागे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्याची भक्कम साथ!

या सर्व खेळाडूंना प्रदीप गांगोडे आणि रमेश पारधी यांचे कठोर परिश्रम आणि अचूक मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या या विक्रमी कामगिरीमध्ये शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक चोगले, मंगेश डोळस, संजय साठविलकर, तसेच सर्व पालक, समिती सदस्य आणि पोषण आहार ताई यांचे विशेष सहकार्य महत्त्वपूर्ण ठरले. या शानदार यशाबद्दल सर्व स्तरातून वाल्मिकीनगर शाळेचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### पाटण तालुका पंचायत समिती निवडणूक २०२५ म्हावशी गणातुन उमेदवार पोपटराव (नाना) कदम यांचे नाव आघाडीवर

### सत्यजितसिंह पाटणकरांचे निकटवर्तीय म्हणून ओळख

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.११, पाटण :** पाटण तालुक्याच्या म्हावशी गणातील चाफळ विभाग हा नेहमीच राजकीय दृष्ट्या संवेदनशील राहिला आहे. जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी आरक्षणे जाहीर झाले आहेत. मात्र पाटण तालुक्यात सत्यजितसिंह पाटणकर (दादा) आणि कार्यकर्ते मंडळी यांनी केलेल्या भाजप पक्षात स्थलांतरामुळे तालुक्यातील राजकारणाला कलाटणी मिळण्याची शक्यता आहे. म्हावशी जिल्हा परिषद गटासाठी सर्वसाधारण पुरुष असे आरक्षण पडल्यामुळे या जागेसाठी तालुक्यातील मातब्बर मंडळी दंड थोपटले असून तयारीला लागले आहेत. मावशी गणातील सुरू असलेल्या गटागटातील अंतर्गत राजकीय दगदग नेहमी कोणाच्या माते पडणार याकडे सर्वांच्या नजरा लागून आहेत. त्यातच पाटण पंचायत समिती उमेदवार म्हावशी गणातुन पोपटराव(नाना) कदम यांचे नाव आघाडीवर येत असल्याचे चर्चेत आहे.

पाटणतालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते, दानशूर आणि विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहकार्य करणारे व्यक्ती म्हणून त्यांची पाटण तालुक्यात आपली ओळख निर्माण केली आहे. त्याचबरोबर पाटण तालुक्यात सत्यजितसिंह पाटणकर यांच्या पहिल्या फळीतील कार्यकर्ते आणि पाटणकर निकटवर्तीय म्हणून यांना पाटण तालुक्यात ओळखले जातात आणि मुंबई आणि पाटण तालुक्यातील युवकांचे प्रेरणास्थान स्थान आहेत ते त्यामुळे पोपटराव (नाना)कदम यांना तिकीट मिळणार असं सर्व पाटण तालुक्यातील युवकांच्या आणि नागरीकांच्या मध्ये चर्चा चालू आहे.

# नवी मुंबईत विद्यादीप विद्यालयाचा क्रीडा महोत्सव उत्साहात संपन्न

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.११, नवी मुंबई :** विद्यादीप विद्यालय कोपरखैरणे येथे दिनांक १ डिसेंबर ते ११ डिसेंबर तीन दिवस चालणाऱ्या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज उद्यान सेक्टर १ ते ४ येथे करण्यात आले .या क्रीडा महोत्सवाच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून आदरणीय नवीमुंबई चे माजी महापौर सुधाकर जी संभाजी सोनवणे हे हजर होते.

कोपरखैरणे से. ४ या विभागात असणाऱ्या विद्यादीप विद्यालय या मराठी, सेमि इंग्रजी व इंग्रजी माध्यमाची शाळेच्या क्रीडा महोत्सवाच्या उदघाटन प्रसंगी विभागाच्या माजी नगरसेविका सायली शिंदे तसेच समाजसेवक नारायण शिंदे, शिवसेना नेते मधुकरजी राऊत, समाजसेविका वैशाली घोरपडे माजी नगरसेवक सुरेश दादा सालदर, संस्थेचे अध्यक्ष योगेश हन्नूरकर, समाजसेवक वसंत जाधव, शाळेच्या मुख्याध्यापिका नेहा गवळी मॅडम पालक वर्ग व विद्यार्थी मोठ्यासंखेने हजर होते. यावेळी उद् घाटन पर संदेशात सुधाकरजी सोनवणे यांनी शाळेच्या आतापर्यंतच्या वाटचालीबद्दलकौतुककरत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व विद्यार्थ्यांनी खेळ हा खिलाडूवृत्तीने खेळून आपणास नितांत आवडणाऱ्या कोणत्याही खेळात आपले करिअर करावे असे सुचित केले. मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून व दीप प्रज्वलन करून सुरुवात करण्यात आली.

पाहुण्यांच्या हस्ते क्रीडा ध्वजारोहण करून मशाल पेटवून ती विद्यार्थ्यांमार्फत शाळेच्या मैदानावर फिरवण्यात आली. या वेळीशाळेतील विद्यार्थ्यांच्या हातात स्वच्छता, रहदारीचे नियम ,स्वच्छ सर्वेक्षण, पर्यावरण जतन, माझी वसुंधरा, तंबाखूमुक्त शाळा इत्यादींबाबत उद्बोधन पर बोधवाक्य लिहिलेले फलक व फुगे देण्यात आले होते.

या दिमाखदार सोहळ्यात प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आकाशात शालेय नामफलक व फुगे सोडून वार्षिक क्रीडा महोत्सवाचे उद् घाटन करण्यात आले.



वार्षिक क्रीडा महोत्सवामध्ये कबड्डी, खो-खो, लंगडी, धावणे, रिले, गोळा फेक, थाळी फेक, लांब उडी, रिंगरेस तसेच लहान मुलांसाठी विविध आकर्षण बौद्धिक खेळांचे देखील आयोजन केले होते. या खेळांमध्ये पालकांसाठीही आकर्षक खेळाचे आयोजन करण्यात आले होते. सदर महोत्सवाच्या आयोजनासाठी दिपक नवले, अमोल खिल्लारे, चन्द्रकान्त बरफ, शितल जुनघरे, व मनिषा शिलीमकर, शिल्पा मोरे, सुधा शर्मा, वर्षा शिर्के, कोमल पाटील, रेश्मा धुमाळ, अलका पवार यांनी अथक परिश्रम घेतले.

सदर महोत्वासाठी पंच म्हणून छत्रपती शाहू महाराज विद्यालय रबाळे येथील विद्यालयातील राष्ट्रीय खो खो कबड्डीचे खेळाडू यांनी कामगिरी पार पाडली क्रीडा महोत्सवाच्या शेवटच्या दिवशी दिनांक ११ डिसेंबर रोजी पारितोषिक वितरण समारंभात स्थानिक नगरसेविका सायली ताई शिंदे समाजसेवक नारायण दादा शिंदे तसेच सेवा सहयोग संस्थेचे राजेश शेट्टी विद्यादीप शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मान योगेशजी हन्नूरकर सर यांच्या शुभहस्ते बक्षीस देऊन मुलांचा गुणगौरव करण्यात आला.

### गांजा विक्री करणारे दोघेजण अटकेत...

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.११, ठाणे :** 'गांजा' सारख्या अंमली पदार्थाची विक्री करण्यासाठी फिरत असलेल्या दोघांना अटक करण्यात ठाणे ग्रामीण पोलिसांनी मोठे यश मिळवले आहे. अंमली पदार्थ विक्रीबाबत मिळालेल्या गोपनीय माहितीनंतर ठाणे ग्रामीण पोलिसांच्या गुन्हे शाखेने ही कारवाई करून ४ किलो ५२ ग्रॅम वजनाच्या रु.१ लाख २० हजार किंमतीच्या गांज्यासह दोघांना अटक केली. अशी माहिती ठाणे ग्रामीण पोलीसांनी दिली आहे.

ठाणे ग्रामीणचे पोलिस अधीक्षक डि.एस. स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर पोलिस अधीक्षक अमोल मित्तल यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलिस उप निरिक्षक महेश कदम, पो.हवा. संतोष सुर्वे, पो.उपनिरीक्षक दीपक किणी, पो.हवा. सतीश कोळी, पो.शि. स्वप्निल बोडके यांच्यासह ठाणे ग्रामीण पोलीस गुन्हे शाखेच्या पथकाने केली. पोलिस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली ठाणे ग्रामीण पोलिसांकडून अंमली पदार्थांच्या विरोधात सुरू असलेल्या मोहीमेला या कारवाईमुळे मोठे यश मिळाले आहे.